अर्धसाप्ताहिक
# ब्रम्हपुरी समाचार
संपादक अशोक भैया
RNI No. MAHMUL/2016/69789
Postal Regd. No. G2/47/CHD-283/2023-25
E-Mail ID : bramhapurisamachar@gmail.com
गुरूवार, दि. 30 ऑक्टोबर 2025 | वर्ष 11 वे | अंक 11 वा | ब्रम्हपुरी | पाने 6 | किंमत 2 रूपये

## नगराध्यक्ष पदासाठी अनेक दिग्गजांच्या नावांची चर्चा

ब्रम्हपुरी/महेश पिलारे

राजकीय पक्षांना व जनतेला स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीचे वेध लागले होते. अशातच ब्रह्मपुरी नगरपालिकेचे नगराध्यक्ष पद ओबीसी प्रवर्गा करीता आरक्षित करण्यात आले आहे. त्यामुळे अनेक राजकीय पक्षातील हौसे, गौसे, नऊसे उमेदवार गुडघ्यांला बाशिंग बांधून तयार आहेत. नगराध्यक्ष पद ओबीसी प्रवर्गासाठी आरक्षित असल्याने राजकीय पक्षातील अनेक दिग्गज ओबीसी उमेदवार या पदासाठी आपला दावा करीत आहेत. त्यामुळे राजकीय पक्षात इच्छुकांची भाऊक गर्दी वाढली आहे. काँग्रेस, भाजपा, यांच्यासह तिसरी आघाडी व इतर पक्षातील नगराध्यक्ष पदासाठी दावा करणाऱ्या उमेदवारांची नावे समोर आली आहेत.

ब्रह्मपुरी नगरपालिकेवर गेल्या अनेक दिवसांपासून प्रशासक राज होते. ब्रम्हपुरी नगरपालिकेचे आरक्षण सोडत निघाल्यानंतर राजकीय हालचालींना वेग आला. ब्रम्हपुरी नगर पालिकेत नगराध्यक्ष पद ओबीसी प्रवर्गाकरीता राखीव असल्याने या पदासाठी राजकीय पक्षातील अनेक ओबीसी नेत्यांची नावे समोर आली आहेत. काँग्रेस पक्षाकडून नगराध्यक्ष पदासाठी प्रसिद्ध उद्योजक तथा माजी नगरसेवक नितीन उराडे, प्रतिष्ठित व्यापारी तथा व्यापारी संघटनेचे



अध्यक्ष योगेश मिसार, प्राचार्य देविदास जगनाडे यांच्या नावाची चर्चा आहे.

तर भारतीय जनता पक्षाकडून माजी नगरसेवक मनोज भूपाल, भाजपा तालुका महामंत्री तथा माजी नगरसेवक मनोज वठे, माजी नगरसेवक विलास विखार, भाजपा शहराध्यक्ष प्राचार्य सुयोग बाळबुद्धे, भाजपा माजी शहराध्यक्ष अरविंद नंदूरकर यांच्या नावाची चर्चा आहे.




शिवसेना पक्षाकडून नरू नरड हे नगराध्यक्ष पदाच्या उमेदवारी करीता दावा करीत आहेत. काँग्रेस व भारतीय जनता पक्षाने नगराध्यक्ष व नगरसेवक पदासाठी उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. राजकीय पक्षातील मातब्बर नेत्यांनी नगराध्यक्ष पदासाठी अर्ज दाखल करून नगराध्यक्ष पदाच्या उमेदवारीसाठी आपलीच निवड होणार असल्याचा दावा केला आहे.

राजकीय पक्षातील अनेक प्रतिष्ठित मातब्बर उमेदवार नगराध्यक्ष पदासाठी इच्छुक

(उर्वरित पान क्र. ६ वर)

## देशात प्रथमच प्रत्येक घराच्या उत्पन्नाचे सर्वेक्षण होणार

### अचूक आर्थिक धोरणे ठरवण्यासाठी माहिती आवश्यक; नागरिकांचा सहभाग महत्त्वाचा

ब्रम्हपुरी/का.प्र.

केंद्र सरकार लवकरच एका ऐतिहासिक आणि महत्त्वाकांक्षी सर्वेक्षणाला सुरुवात करणार आहे. फेब्रुवारी २०२६ पासून देशात प्रथमच राष्ट्रीय कौटुंबिक उत्पन्न सर्वेक्षण राबवले जाणार आहे. सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयासाठी हे आतापर्यंतचे सर्वात आव्हानात्मक सर्वेक्षण मानले जात आहे. देशातील कररचना आणि कल्याणकारी योजना यामध्ये सुधारणा करण्याच्या दृष्टीने हे सर्वेक्षण महत्त्वाचे आहे. परंतु, या सर्वेक्षणाचे यश पूर्णपणे नागरिकांमध्ये जनजागृती निर्माण करणे आणि त्यांचा विश्वास जिंकण्यावर अवलंबून असेल, अशी माहिती मंत्रालयाचे सचिव सौरभ गर्ग यांनी दिली आहे.

**सर्वेक्षणाचा उद्देश आणि गरज** - आजपर्यंत भारताकडे कौटुंबिक उत्पन्नाच्या वितरणाची कोणतीही विश्वासार्ह आणि देशव्यापी आकडेवारी उपलब्ध नाही. आकडेवारी मिळविणे, हा सर्वेक्षणाचा मुख्य उद्देश आहे. यापूर्वी १९५० च्या दशकापासून उत्पन्न मोजण्याचे अनेक प्रयत्न झाले; परंतु देशात प्रथमच प्रत्येक घराच्या उत्पन्नाचे सर्वेक्षण हे सर्वेक्षण यशस्वी झाल्यास त्याचे दूरगामी फायदे मिळतील. २०२७ च्या मध्यापर्यंत या सर्वेक्षणाचे निष्कर्ष अपेक्षित आहेत. यातून मिळणाऱ्या माहितीमुळे देशातील उत्पन्नातील विषमता, करप्रणालीची रचना, शहरी आणि ग्रामीण भागातील कमाईचे स्वरूप यावर अचूक प्रकाश पडेल. देशातील सुमारे ८० टक्के असलेल्या असंघटित क्षेत्रातील कामगारांच्या आर्थिक स्थितीचे खरे चित्र समोर येईल. या माहितीच्या आधारे सरकारला अधिक प्रभावी आणि लोकाभिमुख योजना तयार करणे शक्य होईल.

अनेकदा लोकांनी सांगितलेले उत्पन्न त्यांच्या खर्च आणि बचतीच्या बेरजेपेक्षाही कमी असल्याचे दिसून आले. या विश्वासार्ह आकडेवारीअभावी कल्याणकारी योजना, सामाजिक सुरक्षा कार्यक्रम आणि आर्थिक धोरणे आखण्यात मोठ्या अडचणी येत आहेत.

**सर्वात मोठे आव्हान : लोकांचा विश्वास** - सांख्यिकी मंत्रालयाचे सचिव सौरभ गर्ग यांनी या सर्वेक्षणातील आव्हाने स्पष्ट केली. जागतिकस्तरावर उत्पन्नाचे सर्वेक्षण हे सर्वात कठीण मानले जाते. याच कारणामुळे आम्ही भूतकाळात तीनवेळा प्रयत्न करूनही माघार घेतली; पण यावेळी आम्ही हे सर्वेक्षण पूर्ण करणार आहोत आणि आम्हाला सकारात्मक निकालाची अपेक्षा आहे. सर्वेक्षणापूर्वी केलेल्या चाचणीनुसार, तब्बल ९५ टक्के लोकांनी उत्पन्नाशी संबंधित प्रश्न संवेदनशील मानले आणि आपली माहिती पूर्णपणे गोपनीय ठेवण्याची मागणी केली. त्यामुळे लोकांचा विश्वास संपादन करणे हेच सरकारपुढील सर्वात मोठे आव्हान आहे.

**सरकारची तयारी आणि उपाययोजना** - हे आव्हान पेलण्यासाठी मंत्रालय पूर्णपणे सज्ज झाले आहे. लोकांच्या मनातील भीती दूर करण्यासाठी जनजागृती मोहीम राबवली जाईल. सर्वेक्षणासाठी येणाऱ्या कर्मचाऱ्यांना नागरिकांशी संवाद साधण्याचे विशेष प्रशिक्षण दिले जाईल. गोळा केलेली सर्व माहिती पूर्णपणे गोपनीय ठेवली जाईल आणि तिचा वापर केवळ धोरणात्मक नियोजनासाठीच केला जाईल, अशी हमी सरकार देणार आहे.



## संपादकीय...

# विकृत गुन्हेगारीला ठेचायला हवं

सातारा जिल्ह्यातील फलटण येथे एका डॉक्टर महिलेवर झालेल्या अत्याचारानंतर तिने आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना महाराष्ट्राला हादरवून गेली आहे. या प्रकरणात एका पोलिस अधिकाऱ्याचा समावेश असल्याने त्याला अधिक गांभीर्य प्राप्त झाले आहे. कायदा आणि सुव्यवस्थेवर बोट ठेवले जात असले, तरी या घटनेचा अर्थ केवळ एका ठिकाणापुरता मर्यादित नाही. महाराष्ट्राच्या विविध भागात अलीकडच्या काळात हिंसक, क्रूर आणि विकृत मानसिकतेच्या गुन्ह्यांची मालिका दिसून येते आहे. गुन्हेगारी समाजाचा अपरिहार्य भाग मानला जातो, पण त्याची वाढती तीव्रता ही चिंताजनक आहे. गुन्हेशास्त्रानुसार प्रत्येक गुन्हा शरीराविरुद्ध किंवा मालमत्तेविरुद्ध असतो; पण आजचे गुन्हे या दोन्ही मर्यादा ओलांडून मानवतेविरुद्ध होत चालल्या आहेत. पित्याने स्वत:च्या मुलीवर अत्याचार करणे, किरकोळ वादातून मुलांची हत्या करणे, राजकीय अहंकारातून पत्नीची हत्या करणे, ही केवळ गुन्ह्यांची उदाहरणे नाहीत, तर समाजाच्या मानसिक अधोगतीची लक्षणे आहेत.

फलटणच्या घटनेत पोलिसाचाच सहभाग असल्याने लोकांचा विश्वास डळमळीत होणे साहजिक आहे. कारण, कायदा रक्षणासाठी नियुक्त असलेले पोलिसच जर गुन्ह्याचे भागीदार ठरले, तर न्यायसंस्थेवरचा सर्वसामान्यांचा विश्वास कोसळतो. म्हणूनच या प्रकरणाचा तपास अत्यंत काटेकोरपणे, कोणत्याही दबावाशिवाय आणि निष्पक्षपणे व्हावा, ही नागरिकांची अपेक्षा आहे. एखादा गुन्हा घडल्यावर त्याची चौकशी करणे ही पोलिसांची जबाबदारी असते. पण त्याहून महत्त्वाचे म्हणजे गुन्हा घडू न देणे हा वचक राखणे. आज गुन्हेगारांच्या मनातून पोलिसांचा आणि न्यायव्यवस्थेचा वचक संपल्यासारखा दिसतो. गुन्हा करूनही सुटका मिळेल, राजकीय संरक्षण मिळेल, किंवा पुराव्याअभावी सुटका होईल, हिच भावना गुन्हेगारांच्या मनात बळावत आहे. याला जबाबदार केवळ पोलिस नव्हे, तर संपूर्ण न्यायप्रक्रियेतील विलंब आणि राजकीय हस्तक्षेप आहे.

फलटण प्रकरण हे फक्त एका महिलेवरील अन्यायाचे प्रकरण नाही, तर संपूर्ण न्यायव्यवस्थेच्या विश्वासार्हतेची परीक्षा आहे. या प्रकरणाचा सखोल तपास होऊन दोषींना कठोरात कठोर शिक्षा झाली नाही, तर जनतेच्या मनातील असंतोष उफाळून येईल आणि कायद्याचा आदर कमी होईल. याचबरोबर, अशा घटनेनंतर संबंधित महिलेचे चारित्र्यहनन करण्याची प्रवृत्तीही समाजात वाढत चालली आहे. गुन्हेगारांना वाचवण्यासाठी बळी ठरलेल्या महिलेच्या स्वभावावर, वर्तनावर किंवा वैयक्तिक आयुष्यावर प्रश्नचिन्हे उभारले जातात. ही प्रवृत्ती केवळ अमानुषच नाही, तर स्त्रीविरोधी मानसिकतेची पराकाष्ठा आहे. अशा वेळी महिला आयोग, सामाजिक संघटना आणि संवेदनशील नागरिक यांनी एकत्र येऊन आवाज उठवणे आवश्यक आहे. सरकारनेही या प्रकरणाकडे केवळ ‘चौकशी सुरू आहे’ अशा औपचारिकतेने न पाहता, उदाहरण घालणारा निर्णय देणे आवश्यक आहे.

दोषी कोणताही असो, सामान्य नागरिक की पोलिस अधिकारी... कायद्यापुढे सर्व समान असले पाहिजेत. फलटण घटनेच्या निमित्ताने पोलिस विभागानेही आपल्या अंतर्गत शिस्तीचा पुनर्विचार करावा आणि महिला सुरक्षेबाबत अधिक ठोस उपाययोजना आखाव्या. समाजाची ओळख त्याच्या कायदा-सुव्यवस्थेवर आणि महिलांविषयी असलेल्या संवेदनशीलतेवर ठरते. फलटणमधील घटना या दोन्ही मूल्यांना प्रश्नांकित करते. म्हणूनच आता केवळ निंदा नव्हे, तर कृतीची वेळ आली आहे. दोषींना शिक्षा, पीडितेला न्याय आणि समाजाला धडा हे तिन्ही मिळाले, तरच अशा विकृत गुन्ह्यांना आळा बसेल आणि कायद्यावरील जनतेचा विश्वास पुन्हा दृढ होईल.

# ब्रम्हपुरी हद्दीतील २०११ पूर्वीची अतिक्रमणे नियमानुकूल होणार

ब्रम्हपुरी/का.प्र.

‘सर्वांसाठी घरे - २०२२’ या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या क्षेत्रात असलेल्या सर्व महसुल अखत्यारित असलेल्या कोणत्याही प्रकारच्या शासकीय जमिनीवर अतिक्रमणे नियमानुकूल करण्यात येत आहे.

त्यानुसार ब्रम्हपुरी न.प. क्षेत्रातील अतिक्रमण धारकांनी नगर परिषद कार्यालयामध्ये आपले नाव तपासावे आणि अर्ज करुन योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन एका पत्रकाद्वारे नगर परिषद मुख्याधिकारी यांनी केले आहे. अर्जासोबत अतिक्रमण २०११ पुर्वीचे असल्याचा पुरावा, आधार कार्ड, टॅक्स पावती, नमुना आठ, जात प्रमाणपत्र दाखल करावे, अशी माहिती त्यांनी दिली आहे.

# पेठ वार्डातील कुस्त्यांच्या दंगलीला ६० वर्षाची परंपरा




ब्रम्हपुरी/का.प्र.

दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुद्धा दीपावलीच्या शुभ मुहुर्तावर जय बजरंग व्यायाम मंडळ आणि श्री.गुरुदेव सेवा मंडळ यांचे संयुक्त विद्यमाने भव्य पुरुषांच्या दंगलीचे पेठ वार्ड ब्रम्हपुरी येथे आयोजन करण्यात आले होते. सलग ६० वर्ष या मंडळाच्या वतीने कुस्त्यांच्या दंगलीचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या उद्घाटनाप्रसंगी तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष खेमराज [illegible], सामाजिक कार्यकर्ते दिपक उराडे, अनंता उरकुडे, माजी नगरसेवक महेश भर्रे, अविनाश राऊत, प्रतिक रत्नपारखी, सोनू गेडाम, सिद्धेश्वर भर्रे, निनाद गडे, अश्विन उपासे, सोमा उपासे, गंगाधर पिलारे सर, रविंद्र पिलारे सर, मधुकरजी राऊत, रवि मैंद व अन्य मान्यवर उपस्थित होते.

या दंगलीमध्ये महिला कुस्ती पटू तसेच पुरुष कुस्तीपटू यांनी मोठ्या संख्येत हजेरी लावली होती .कुस्त्यांच्या दंगलीचा आनंद घेण्याकरीता ब्रम्हपुरी शहरातील तथा आजुबाजूच्या खेडे विभाग परिसरातील प्रेक्षकांची सुद्धा मोठ्या संख्येत उपस्थित होते. कार्यक्रमात भुवनेश्वर येथे पार पडलेल्या १८ वर्षांखालील १००० मीटर धावण्याच्या शर्यतीत महाराष्ट्रातील पेठ वार्ड ब्रह्मपुरी येथील प्रणय गणेश उपासे (१७) याने तृतीय क्रमांक मिळवत कांस्यपदक पटकाविले. त्याचा प्रतीक रत्नपारखी यांच्या हस्ते जाहीर सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक संदीप राऊत यांनी तर आभार प्रदर्शन भास्कर उरकुडे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ओमसागर उरकुडे, संदीप राउत, कुणाल भगत, कुणाल उरकुडे, शंकर उरकुडे , परिमल उरकुडे, उमेश राउत , अंश हजारे, विशाल राउत, अतुल भोयर, माधव उरकुडे, प्रमोद कुथे व श्री. गुरुदेव सेवा मंडळ तसेच जय बजरंग व्यायाम मंडळ मंडळच्या संपूर्ण कार्यकर्त्यांनी परिश्रम घेऊन कार्यक्रम यशस्वी केला.

## महाराष्ट्र इन्स्टिट्युट ऑफ फार्मसी बेटाळा येथे

# सायबर गुन्हेगारीवर कार्यशाळा संपन्न

ब्रम्हपुरी/का.प्र.

दि.२७ ऑक्टोबरला महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी बेटाला महाविद्यालयात ब्रम्हपुरी पोलिस ठाणे येथील पोलीस



उपनिरीक्षक गौतम सर तसेच हेकॉन्स्टेबल अरुणजी पिसे तसेच संस्थेचे अध्यक्ष देवेंद्रजी पिसे यांच्या प्रमुख उपस्थितीत सायबर गुन्हेगारीवर कार्यशाळा कार्यक्रम पार पडला.

यावेळी मार्गदर्शन करतांना गौतम सर यांनी सांगितले की, माहिती तंत्रज्ञानाचा वापर झपाट्याने वाढत आहे. त्यामुळे सर्वांना इंटरनेटचे वापर करणे सहज झाले आहे, त्यामुळेच इंटरनेट वापरकर्त्यांची संख्याही वाढत आहे. त्यामुळे सर्वांना संगणक गुन्हेगारीबद्दल जागरूक राहणे आवश्यक झाले आह. हेड कॉन्स्टेबल अरुणजी पिसे यांनी संगणक तंत्रज्ञान स्थिर नाही ते सतत विकसित होत असल्याने अंतिम वापरकर्त्यांना त्यांच्या डाटा गोपनीयता आणि सुरक्षितता उपाययोजनाबद्दल कसे जागरूक राहावे याबाबत अतिशय महत्त्वाची माहिती आपल्या मार्गदर्शन पर भाषणात स्पष्ट केली.

राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी प्रा.श्रीकांत महाजन यांनी प्रास्ताविकातून सायबर गुन्हे म्हणजे याबद्दल माहिती दिली.

कार्यक्रमाचे आयोजन प्रा.पृथ्वीराज मेश्राम, प्रा. पूजा घुटके, प्रा.रेश्मा मातेरे, प्रा.चेतन चौधरी यांनी केले. संचालन व आभार प्रदर्शन प्रा.श्रीकांत महाजन यांनी केले.

## विनोदिनी

काल एका गेट-टुगेदर कार्यक्रमात नवरा आपल्या बायकोला सोबत घेऊन गेला होता... कार्यक्रमामध्ये बायको हिसमुसून होती व इतर स्त्रिया तिची गंमत करीत होत्या... कार्यक्रमाहून आल्या-आल्या बायको नवऱ्याला म्हणाली...

बायको : अहो हे टक्कल... किती वाढत चाललंय तुमचं काहीतरी करा त्याचं..

नवरा : कोणी काही बोललं का?

बायको : तुम्हाला पाहून माझ्या मैत्रिणी बोलतात...

नवरा : काय बोलतात...??

बायको : पुरणपोळी शेकायला नवीन खापर तयार होतंय...!!!

# नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयाचे हॅण्डबॉल स्पर्धेत सुयश

## पनवेल येथील राज्यस्तरीय स्पर्धेत नागपूर विभागाचे प्रतिनिधीत्व करणार

ब्रम्हपुरी/का.प्र.

क्रीडा व युवक सेवा संचालनालय पुणे आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने विभागीयस्तरीय हॅण्डबॉल क्रीडा स्पर्धा यशवंत स्टेडियम नागपूर येथे दि. १७ ऑक्टोबर २०२५ ला आयोजित करण्यात आली होती. यामध्ये १९ वर्षाखालील मुलींच्या हॅण्डबॉल स्पर्धेमध्ये नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालय, ब्रम्हपुरीचा संघ विजेता ठरला असून पनवेल (मुंबई) येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेत



नागपूर विभागाचे नेतृत्व करणार आहे.

विजेत्या मुलींच्या संघात सानिका पारधी (कर्णधार), वंशिका प्रधान, प्रियंका पारधी, अक्षरा बावनकुळे, प्रासिद्धी खानोरकर, माही जांभुळकर, मानसी कुणघाडकर, राणी चापले, सानिया बनकर, समीक्षा राऊत, गुणगुण बेदरे, प्रांजली महाजन, अदिती राऊत, रुची चौधरी, श्रुती मेश्राम,दिशा पिलारे या सर्व खेळाडूंनी उत्कृष्ट असे खेळाचे प्रदर्शन केले. या क्रीडा स्पर्धेत महाविद्यालयाच्या संघाने वर्धा विरुद्ध ९-२ तर अंतिम सामन्यामध्ये भंडारा संघाला १० - ०३ अश्या फरकाने हरवून विजेतेपद मिळविले. त्यामुळे दि. २७ ते ३१ऑक्टोबर २०२५ दरम्यान पनवेल(मुंबई) येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेत नागपूर विभागाचे नेतृत्व करण्याचा मान नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालय, ब्रम्हपुरीला मिळाला आहे.

हॅण्डबॉल संघातील सर्व खेळाडूंना संस्थेचे सचिव अशोकजी भैया, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एम. शेकोकर, डॉ. एम. ए. शेख क्रीडा समिती अध्यक्ष, डॉ. के. एम. शर्मा, प्रा. आनंद भोयर पर्यवेक्षक कनिष्ठ महाविद्यालय, संजू मेश्राम महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद, क्रीडा समिती मधील सर्व सदस्य, शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद यांनी शुभेच्छा दिल्या.

या संपूर्ण संघाला व्यवस्थापक म्हणून संजू मेश्राम सर तर प्रशिक्षक म्हणून सुरज मेश्राम, शुभम जंगले, राकेश रुईकर, ऋतूज मेश्राम, सौरभ तलमले यांनी मोलाचे सहकार्य केले.

## आम. वडेट्टीवारांचे हस्ते विविध विकासकामांचे भूमीपूजन




ब्रम्हपुरी/का.प्र.

सत्तेत असो वा विरोधी बाकावर, विकासकामात कुठलीही तडजोड न करता मतदारसंघाच्या विकासासंदर्भात सदैव कटिबध्द असणारे राज्याचे माजी विरोधी पक्षनेते, कॉंग्रेस विधीमंडळ पक्षनेते, आमदार विजय वडेट्टीवार यांनी विकासाचा झंझावात कायम राखत ब्रम्हपूरी तालुक्याच्या विकासासाठी शासनस्तरावर अथक प्रयत्न करीत कोट्यवधी रुपयांचा विकासनिधी खेचून आणला. याच विकास निधी अंतर्गत ब्रम्हपूरी तालुक्यातील विविध गावांमध्ये विकासकामांचा भुमीपुजन व लोकार्पण सोहळा पार पडला.

आयोजित विकासकामात मालडोंगरी येथील आरोग्य उपकेंद्राच्या संरक्षण भिंत बांधकामाचे भूमिपूजन (२० लक्ष रू.), चौगान येथे अभ्यासिका बांधकाम भुमीपुजन (४५ लक्ष रू.), खडीकरण रस्ता बांधकाम भुमीपुजन (१० लक्ष रू.), जुगनाळा अभ्यासिका बांधकाम भुमीपुजन (१५ लक्ष रू.), किन्ही येथे बौद्ध समाज मंदिर लोकार्पण (१५ लक्ष रू.), भोई समाज मंदिर बांधकाम भुमीपुजन(१५ लक्ष रु.), रणमोचन येथे समाज मंदिर बांधकाम भुमीपुजन (१५ लक्ष रू.), निलज येथे समाज मंदिर बांधकाम भुमीपुजन (१५ लक्ष रू.), रूई सिमेंट रस्ता बांधकाम भुमीपुजन (८ लक्ष रू.), तुलानमाल येथे मानका देवी समाज मंदिर लोकार्पण (१५ लक्ष रू.), गायडोंगरी येथे समाज मंदिर बांधकाम भुमीपुजन (१५ लक्ष रू.), रानबोथली येथे समाज मंदिर लोकार्पण (१५ लक्ष रू.), सावरदंड चक ते मुख्य रस्त्यापर्यंत खडीकरणाच्या बांधकामाचे भुमीपुजन (३० लक्ष रू.), चकबोथली येथे बौद्ध समाज मंदिर बांधकाम भुमीपुजन (१५ लक्ष रू.) या कामांचा समावेश आहे.

याप्रसंगी बहुसंख्येने गावकरी व कॉंग्रेस पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## ब्रम्हपुरी योग समितीतर्फे

## लघु व्यावसायिकांना दिवाळी फराळाचे वाटप

ब्रम्हपुरी/का.प्र.

दिवाळी दरवर्षीच येत असते पण सर्वांचीच दिवाळी ही सारखीच साजरी होत नसते.



कुणाचं घर लख्ख दिव्यांनी उजळून निघत असते तर कुणाच्या घरी एक पणती पण लागत नसते. समाजात आर्थिक विषमता असतेच तरीपण अशांच्या ही घरी दिवाळी साजरी झाली पाहिजे, त्यांना पण आनंद मिळाला पाहिजे. याच सामाजिक बांधिलकीने, सामाजिक समरसतेने योग समिती ब्रम्हपुरीद्वारे आर्थिकदृष्ट्या कमजोर असणाऱ्या लोकांची सुध्दा दिवाळी साजरी व्हावी म्हणून गावातील काही विविध लघू व्यावसायिकांना दिवाळी फराळाच्या किट चे वाटप केले.

हि किट घेतांना त्या लोकांनी आभार व्यक्त केले व आनंद व्यक्त केला.

या कार्यक्रमाला भगवान कन्नाके, राजूजी भागवत, दिलीपजी जुमडे, गजाननराव बुरले, भाऊरावजी बांगरे, अनिलजी मुळे, दिलीप भूपाल, एकनाथजी दोनाडकर, डॉ. शेंडे, घनश्यामजी कावळे, राऊत साहेब , खुशाल उमक, रश्मी खानोरकर उपस्थित होते.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी भागवत सर , कन्नाके सर व जुमडे सर यांनी विशेष परिश्रम घेतले.

## चिंचोली बुज येथील बाबाजान दरबारी स्नेहमिलन सोहळा



ब्रम्हपुरी/का.प्र.

अल्हाज हजरत सैय्यद मोहम्मद ईकबलशाहा बाबा उर्फ बाबाजान कादरी चिस्ती चिंचोली(बूज) येथे दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुद्धा मोठ्या उत्साहात दिवाळी निमित्ताने स्नेहमिलन सोहळा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया व नागपूर जिल्यातील भाविक भक्ताची मोठ्या प्रमाणात गर्दी उसळली होती.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आरमोरी विधानसभा क्षेत्राचे आमदार रामदास मसराम तर विशेष अतिथी अम्मासाहेबा, शफिबाबा, शरीफबाबा, प्रमोद बानबले पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन ब्रम्हपुरी, तुषार सोम भाजपा प्रदेश कार्यकारणी सदस्य, गिराम पोलीस उपनिरीक्षक, शरीफभाई से.नी.पो.अधिक्षक, बलराम डोडानी, अजय जयस्वाल, माजी सभापती परसराम टिकले, अरविंद जयस्वाल, गणेश पेंदाम, बीट अंमलदार अरुण पिसे, प्रकाश पारधी, गजानन ढोरे सरपंच चिंचोली, रामलाल ढोरे उपसरपंच, गिरीधर बुल्ले अध्यक्ष तं.मु . स.चिंचोली (बूज)व अन्य मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे संचालन पाचपांडे सर तर आभार प्रदर्शन गोवर्धन दोनाडकर यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी अल्हाद हजरत सैय्यद ईकबलशाहा बाबा उर्फ बाबाजान दरबारी सेवक, पोलिस कर्मचारी, तसेच भक्तगण यांनी मोलाचे सहकार्य केले.

# ब्रम्हपुरीत कुणबी समाज सभागृह व अभ्यासिकेच्या इमारतीचे भूमीपूजन

## समाज एकोप्यातून सामाजिक नितीमुल्यांचे संवर्धन - विधीमंडळ पक्षनेते आम. विजय वडेट्टीवार



ब्रम्हपुरी/का.प्र.

'समाज शिक्षित झाला की त्याची प्रगती निश्चितच आहे. म्हणून आपल्या समाजाला उच्च शिक्षित करणे ही काळाची गरज आहे. मात्र आज समाजात सर्वत्र जाती व धर्माच्या नावाने विष पेरले जात असून समाजात फूट पाडण्याचे कार्य समाज कंटकांकडून सुरू आहे. अशा वाईट प्रवृत्तींना समूळ नष्ट करण्यासाठी आपण सर्वांनी एकसंघ होऊन अशा देश विघातक प्रवृत्तींचा प्रतिकार करून समाज एकोप्यातून सामाजिक नितीमूल्यांचे संवर्धन करण्यासाठी पुढाकार घ्यावा', असे प्रतिपादन राज्याचे माजी विरोधी पक्षनेते तथा विधिमंडळ पक्षनेते आम. विजय वडेट्टीवार यांनी केले. ते ब्रम्हपुरी येथे अखिल कुणबी समाज मंडळाच्या सभागृह व अभ्यासिकेच्या इमारतीचे भूमिपूजन सोहळ्या प्रसंगी उद्घाटक म्हणून बोलत होते.

आयोजित भूमिपूजन सोहळ्यास अध्यक्ष कुणबी समाज मंडळाचे अध्यक्ष रूषी राऊत, तर प्रमुख अतिथी म्हणून प्राचार्य डॉ. देविदास जगनाडे, कृउबा सभापती प्रभाकर सेलोकर, सीडीसीसी बँक संचालक दामोधर मिसार, माजी जि.प.सदस्य प्रमोद चिमुरकर, ॲड . गोविंद भेंडारकर, फाल्गुन राऊत, माजी नगराध्यक्षा वनिता ठाकूर, माजी प्राचार्य भाऊराव राऊत, योगेश मिसार, अनिल दोनाडकर, मोंटु पिलारे, डॉ. राकेश तलमले, नेकराज वझाडे, प्रा.प्रकाश बगमारे, राजू पिलारे, हरीचंद्र चोले, माजी नगरसेवक डॉ नितीन ऊराडे, जयश्री कुथे, अल्का खोकले व इतर मान्यवर मंचावर उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना विधिमंडळ पक्षनेते आ. विजय वडेट्टीवार म्हणाले की, मराठा समाजाला स्वतंत्र आरक्षण देण्याऐवजी सरकारने ओबीसी प्रवर्गातून आरक्षण दिल्याने ओबीसी प्रवर्गातील ३७४ जाती व पोट जातींच्या आरक्षणावर गंडांतर आले आहे. आपला न्याय हक्क व आरक्षण पूर्वरत मिळवण्यासाठी समाजाने एकजूट होऊन संघर्ष केला पाहिजे. अन्यथा आपल्या भावी पिढीचे भविष्य संपूर्ण अंधकारमय होईल. म्हणून आरक्षण वाचविण्याच्या संघर्षात सर्वांनी तन-मन-धनाने सामील व्हा असे आव्हान देखील यावेळी विधिमंडळ पक्षनेते आ.विजय वडेट्टीवार यांनी केले.

तत्पूर्वी ब्रम्हपुरी येथे कुणबी समाज सभागृह तथा अभ्यासिका बांधकामकरिता विशेष प्रयत्नातून २.५० कोटी रुपये निधी मंजूर केल्याबाबत अखिल कुणबी समाज मंडळ ब्रह्मपुरीच्या वतीने विधिमंडळ पक्षनेते आ. विजय वडेट्टीवार यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. आयोजित कार्यक्रमास मोठ्या संख्येने कुणबी समाज बांधव, काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच ब्रह्मपुरी वासीय नागरिक उपस्थित होते.

# भाकपाचे विशाल धरणे व तीव्र निदर्शन आंदोलन



ब्रम्हपुरी/का.प्र.

राज्यातील सरकार शेतकरी, शेतमजूर, जबरानजोत, झोपडपट्टीधारक, निराधार यांच्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहे. त्यांचे अनेक प्रश्न आजही प्रलंबित आहेत. सरकारने केलेली वचनपूर्तीची आठवण करून देण्यासाठी दिनांक २७ ऑक्टोबर २०२५ ला भारतीय कम्युनिस्ट पार्टी व महाराष्ट्र राज्य किसान सभा यांच्या वतीने शेतकरी, शेतमजूर, जबरानजोत झोपडपट्टीधारक संजयगांधी निराधाराचा विशाल आक्रोश धरणे आंदोलन व तीव्र निदर्शने कॉ.विनोद झोडगे यांच्या नेतृत्वात करण्यात आले.

शेतकऱ्यांना सरसकट कर्ज माफी करा, शेतकऱ्यांना बीन व्याजी कर्ज द्या, पूरग्रस्त विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क तात्काळ माफ करा, जबरानजोत धारकांना, झोपडपट्टीधाकांना जमिनीचे पट्टे देण्यात यावे , अतिवृष्टी ग्रस्त शेतकऱ्यांना हेक्टरी ७० हजार रुपये नुकसान भरपाई देण्यात यावी, नुकताच अवकाळी पावसाने शेतकऱ्यांची प्रचंड नुकसान झाली आहे तेव्हा तातडीने पंचनामे करून भरीव मदत द्या, शेतकरी, शेतमजूर, असंघटित कामगार यांना दरमहा ५ हजार रुपये मानधन देण्याचा कायदा करावा, संजय गांधी निराधार योजनेचे थकीत रक्कम त्यांच्या खात्यात तात्काळ जमा करावे, जंगल व्याप्त गावात वाघांचा तात्काळ बंदोबस्त करावा, मुडझा आवळगांव रोड चे काम जलदगतीने सुरू करावे. उन्हाळी हंगामा करिता गोसेखुर्द धरणाचे उजव्या कालव्याचे पाणी द्या. आदी मागण्यांसाठी छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे विशाल आक्रोश धरणे आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनात निमंत्रक किसान कामगार नेते कॉ.विनोद झोडगे पाटील, कॉ.डॉ. महेश कोपुलवार, सुधाकर महाडोरे, प्रशांत डांगे, अविनाश राऊत, हरिश्चंद्र चोले, लोमेश मेश्राम, आदींनी मार्गदर्शन केले. त्यानंतर सबंधित मागण्याचे निवेदन उपविभागीय अधिकारी यांना कॉ.विनोद झोडगे यांच्या नेतृत्वात मुख्यमंत्री व कृषी मंत्री यांना देण्यात आले. निवेदन देताना धनराज ठाकरे, सुधीर खेवलें, तुकाराम महाडोरे, वर्षा घुमे, हिरालाल नागपुरे, बाळकृष्ण दुमाणे, रामदास कांबळी, तुळशीराम काटलाम ,शरद ठाकरे, विजय उरकुडे, दादाजी तोंडरे, रामुजी ठवरे, भाऊराव ठाकरे आदी शेतकरी उपस्थित होते.

❁❁❁❁❁❁

ब्रम्हपुरी समाचारच्या अंकाकरीता
www.bramhapuri samachar.com/bs
या ऑनलाईन साईटला भेट द्या
बातम्यांकरीता संपर्क :
मो. 9503100964
मो. 8275715315

# एलएमबी पब्लिक स्कुलमध्ये प्रि-प्रायमरी विभागाचा दिवाळी सेलिब्रेशन











ब्रम्हपुरी/का.प्र.

एल. एम. बी. पब्लिक स्कुल ब्रम्हपुरी येथे दिवाळी सेलिब्रेशनचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांना दिवाळीतील प्रत्येक दिवसाचे महत्व समजावून सांगण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. स्कुलच्या संचालिका आशिता भैया मॅडम यांनी शिक्षकांना ॲक्टीव्हीटी घेण्यास प्रोत्साहन दिले व सर्व शिक्षकांनी दिवाळी या सणाचे महत्व मुलांना आपआपल्या वर्गामध्ये सांगितले.

एल. एम. बी. स्कुल ही विद्यार्थ्यांना शैक्षणिक, बौद्धिक, शारिरीक शिक्षणासोबतच आपल्या राष्ट्रीय सणांविषयी माहिती विद्यार्थ्यांना मिळावी. याकरिता अशा प्रकारच्या उपक्रमाचे आयोजन नेहमी करण्यात येत असतात. देशात साजरा केल्या जाणाऱ्या सर्व सणांमध्ये प्रसिद्ध आणि महत्वाचा सण म्हणून दिवाळी या सणाकडे पाहिले जाते. दिवाळी हा सण रोशनाई, उत्साह मैत्री व मानवतेने ओतप्रोत उत्सव आहे. दिवाळी हा सण १४ वर्षानंतर प्रभू रामचंद्र, वनवासातून अयोध्या नगरी मध्ये आल्यानंतर अयोध्या नगरी दिव्यांनी सजविण्यात आली. तेव्हा दिवाळी हा दिव्यांचा सण म्हणून साजरा करण्यात येतो.

अशाप्रकारे विद्यार्थ्यांना दिवाळी सणाचे महत्त्व समजवून त्यांच्याकडून विविध प्रकारच्या दिवाळी संबंधित ॲक्टिव्हिटीज करवून घेण्यात आल्या.

**जल है तो कल है...**

# आता रेशन दुकानातून ज्वारीही मिळणार !

## आनंदाचा शिधा बंद झाल्याने अनेकांच्या आशेवर पाणी

ब्रम्हपुरी/का.प्र.

सरकारने यंदाच्या दिवाळीत 'आनंदाचा शिधा' उपक्रम राबविलेला नाही. दुसरीकडे अनेक जिल्ह्यांत रेशनवर गव्हाऐवजी ज्वारीचा पुरवठा करण्यात आला आहे. पुढील महिन्यातही काही जिल्ह्यात ज्वारीचा पुरवठा करण्यात येणार असल्याची माहिती मिळाली आहे. त्यातच आता आनंदाचा शिधा बंद झाल्याने अनेकांच्या आशेवर पाणी फेरले गेले आहे. दरम्यान, जिल्ह्यात सध्यातरी रेशनवर गहू मिळत आहे. मात्र पुढील काही महिन्यांमध्ये गहू ऐवजी ज्वारी मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

महाराष्ट्र सरकारने यंदाच्या दिवाळीत आनंदाचा शिधा योजना राबवली नाही, राज्यातील अनेक जिल्ह्यांत रेशन दुकानांवर गव्हाऐवजी ज्वारीचा पुरवठा सुरू झाला आहे. या घडामोडींनी राज्यातील गरीब कुटुंबांच्या दिवाळीवर परिणाम झाला आहे. महायुती सरकारने तीन वर्षापूर्वी सुरू केलेली आनंदाचा शिधा योजना राज्याच्या आर्थिक चणचणीमुळे यंदा बंद पडली आहे गणेशोत्सवानंतर दिवाळीलाही नागरिकांना हा शिधा मिळाला नाही. ही योजना कायमचीच बंद होण्याची चिन्हे दिसत आहेत. निवडणुकीपूर्वी विधानसभा घोषित केलेल्या लाडकी बहीण योजना, शेतकऱ्यांना मोफत वीज आणि इतर योजनांसाठी सरकारने कोट्यवधी रुपयांची तरतूद केली होती. या खर्चामुळे राज्याच्या वित्तीय आरोग्यावर मोठा ताण पडला आहे. निधी न देण्याच्या धोरणामुळे योजना कागदावर आहेत. यामुळे मात्र सामान्य गरीब कुटुंबीयांमध्ये नाराजी व्यक्त करण्यात आली आहे. आता गहू तरी नियमित द्या, अशी मागणीही लाभार्थी करीत आहेत.

# अवकाळी पावसाने ब्रम्हपुरी तालुक्यातील धान पिकाची नासाडी

## पंचनामे करून आर्थिक मदत करण्याची मागणी

ब्रह्मपुरी/का.प्र.

तालुक्यात सर्वत्र अवकाळी पावसाने हजेरी लावली असून सध्या ब्रम्हपुरी तालुक्यातील बऱ्याच गावातील शेतकऱ्यांनी धान पिकाची कापणी सुरू केली होती. शेतात कापून ठेवलेल्या पिकाची मोठी हानी झाली असुन धानपिक भिजल्याने उत्पादन घटण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. त्यामूळे पुन्हा एकदा शेतकरी चिंताग्रस्त झाला आहे.

दिवसाभर उन्ह तापल्यानंतर शनिवारी दुपारी तीन-चार वाजताच्या दरम्यान अचानक आलेल्या पावसाने दैनंदिन कामात व्यक्त असलेल्या नागरिकांची चांगलीच तारांबळ उडाली. सध्या ब्रम्हपुरी तालुक्यातील बऱ्याच गावात धान पिक कापणीला सुरुवात झाली आहे. पावसात भिजलेल्या कडपा सध्या पाण्यात पडल्या आहेत. शेतकऱ्याच्या हातात आलेला धान पिक पाण्याखाली आल्याने शेतकऱ्याच्या डोळ्यात पाणी आले आहे. शासनाने पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याची मागणी शेतकऱ्यांकडून केली जात आहे.

# काँग्रेस पक्षातून उमेश धोटे यांचे निलंबन मागे



ब्रम्हपुरी/का.प्र.

पक्षविरोधी वृत्ती केल्याच्या कारणावरून भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या ओबीसी विभागाचे ब्रम्हपूरी तालुकाध्यक्ष उमेश धोटे यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई म्हणून दि. २५ नोव्हेंबर २०२४ रोजी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षातून ६ वर्षाकरीता निलंबित करण्यात आले होते. मात्र काँग्रेस विधीमंडळ पक्षनेते, आमदार विजय वडेट्टीवार व चंद्रपूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष सुभाष धोटे यांची पक्षातील पदाधिकाऱ्यांसोबत झालेल्या चर्चेअंती काही अटी घालून देत उमेश धोटे यांचे निलंबन मागे घेतले आहे.

उमेश धोटे हे गेल्या एक वर्षापासून काँग्रेस पक्षातुन निलंबित होते. परंतु त्यांनी वर्षभरात कोणत्याच पक्षांमध्ये प्रवेश केला नाही. अशा परिस्थितीत त्यांनी विजय वडेट्टीवार यांना विनंती केली होती या विनंतीनुसार त्यांचा निलंबन रद्द करण्यात आले असल्याची माहिती तालुका अध्यक्ष खेमराज तिडके यांनी दिली आहे.

हे निलंबन मागे घेत असतांना त्यांना काही अटी घालून देण्यात आल्या आहेत. त्यामध्ये आगामी होवू घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या व इतर सर्व प्रकारच्या निवडणुकांमध्ये आपण काँग्रेस पक्षाच्या उमेदवाराचे आपल्या सर्व सहकाऱ्यांसह प्रामाणिकपणे काम करावे असे नमुद करण्यात आले आहे. त्यांच्याकडे निलंबनापुर्वी असलेले भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या ओबीसी विभागाचे तालुका अध्यक्ष पद हे कायम ठेवण्यात आलेले आहे. यासंदर्भात ब्रम्हपूरी तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष खेमराज तिडके यांनी पत्राद्वारे उमेश धोटे यांना कळविले असुन पक्षविस्ताराच्या दृष्टीने अधिक जोमाने संघटनात्मक कार्य करावे अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

# महाराष्ट्र नाभिक महामंडळाच्या जिल्हाध्यक्ष पदी रविंद्र येसेकर



ब्रम्हपुरी/का.प्र.

महाराष्ट्र नाभिक महामंडळ मुंबई यांची नुकतीच बैठक संपन्न होवुन महाराष्ट्र नाभिक महामंडळाचे पूर्व विदर्भ अध्यक्ष डॉ.प्रा. अशोक सालोटकर, ब्रम्हपुरी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत चंद्रपूर जिल्हा नाभिक महामंडळाच्या अध्यक्षपदी रवींद्र येसेकर यांची सर्वानुमते नियुक्ती करण्यात आली.

याप्रसंगी कवडुजी मांडवकर, घनश्याम सुर्यवंशी, आनंदराव सुर्यवंशी, दीपक नक्षीने, देवेंद्र वाटकर, विजय कोंडके, अरुण चौधरी, रविंद्र हनुमंते, प्रविण वाटेकर, विश्वंभर मांडवकर, मधुकरराव क्षिरसागर, राजेंद्र बनसोड, रविंद्र येसेकर, जाबुवंत निंबाळकर, ज्ञानेश्वर वाटकर, गजानन वाटकर, दतु कडुकर, महेश आंबेकर, अर्पित नक्षिने व समाजबांधव उपस्थित होते.

# धावपटू प्रणय उपासेला प्रतिक रत्नपारखी यांचा मदतीचा हात



ब्रह्मपुरी/का.प्र.

उडीसा राज्यातील भुवनेश्वर येथे पार पडलेल्या १८ वर्षाखालील १००० मीटर धावण्याच्या शर्यतीत महाराष्ट्रातील ब्रम्हपुरी येथील प्रणय गणेश उपासे (१७ ) याने तृतीय क्रमांक मिळवत कांस्य पदक पटकाविले. राष्ट्रीय ॲथेलेटिक स्पर्धेत स्थान मिळवून भारतातून तिसऱ्या क्रमांकावर तर महाराष्ट्रातून प्रथम क्रमांक पटकावून प्रणयने ब्रह्मपुरीच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला त्या धावपटूचे ब्रह्मपुरी शहरात जल्लोषात स्वागत करण्यात आले.

ब्रह्मपुरी शहरातील व्यापारी प्रतिक रत्नपारखी यांनी ब्रह्मपुरी पेठ वार्ड येथे नुकत्याच पार पडलेल्या कुस्ती दंगल स्पर्धेतील कार्यक्रमाप्रसंगी प्रणय उपाशे यांना सामाजिक बांधिलकी जोपासत प्रणयच्या राष्ट्रीय स्पर्धेतील उत्कृष्ट कामगिरीबद्दल ११,००० रोख रक्कम देऊन गौरव केला आहे.

४० व्या राष्ट्रीय ॲथलेटिक्स स्पर्धा दि. १० - १४ ऑक्टो. या कालावधीत भुवनेश्वर येथे पार पडल्या. यात हरियाणाचा प्रिन्स प्रथम, द्वितीय क्रमांक उत्तराखंड येथील सुरज सिंग याने मिळविला. तर महाराष्ट्रातील एकमेव धावपटू प्रणय उपासे याने तृतीय क्रमांक मिळवत कांस्य पदक पटकवले आहे. त्याबद्दल सर्वत्र प्रणयचे अभिनंदन होत आहे. प्रणयची हालाखीची परिस्थिती लक्षात घेता भविष्यात त्यांच्या पुढील स्पर्धेसाठी आर्थिक अडचण निर्माण झाल्यास किंवा त्याच्या प्रशिक्षणासाठी पैशाची आर्थिक अडचण भासल्यास मी सदैव प्रणयला आर्थिक मदत करणार असल्याचे आश्वासन सुद्धा प्रतीक रत्नपारखी यांनी दिले आहे.

**... QUOTES ...**

"You never ready for what you have to do. You just do it. That makes you ready."
- Flora Rheta Schreiber

**चारोळी**

माझ्याकडे पाहून हसतेस तू,
मला जिंकल्यासारखे वाटते...
तुझ्याकडे पाहून कुणी हसलं तर,
ज्युनिअरने रॅगिंग केल्यासारखे वाटते...

★ रचनाकार : डॉ. राजन जयस्वाल ★

# एलएमबी स्कुलमध्ये जल्लोषात दिवाळी सेलिब्रेशन







ब्रम्हपुरी/का.प्र.


सर्व सणांमध्ये दिवाळी हा सण वैशिष्टपूर्ण म्हणावा लागेल. कारण तो येण्यापूर्वी आणि येतांना देखील आनंद, उत्साह घेऊन येतो. 'घरात लक्ष्मीचा निवास अंगणी दिव्यांची आरास मनात वाढवी उल्हास दिवाळी अशी खास'. ह्या दिवाळी सणाचे औचित्य साधून ब्रम्हपुरी येथील एल. एम. बी. पब्लिक स्कुलमध्ये बुधवार दि. १५ ऑक्टोंबर २०२५ ला Diwali Celebration चे आयोजन वर्ग १ ली ते ५ वी च्या विद्यार्थ्यांकरीता करण्यात आले.

यात विद्यार्थ्यांनी ॲक्टिव्हिटीच्या माध्यमातून विविध प्रकारच्या दिव्यांचा सजावटी केल्या. विद्यार्थ्यांनी टाकाऊ सि.डी चा उपयोग करून अतिशय सुरेख अशी दिवा सजावट केली. ह्या ॲक्टिवीटीच्या माध्यमातून मुलांच्या कला गुणांना वाव मिळाला. विद्यार्थ्यांना टाकाऊ वस्तु पासून टिकाऊ वस्तू बनविण्यास प्रोत्साहित करण्यात आले. शिक्षक शिक्षिकांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. हा सण आपल्याला एकोप्याचे आणि सकारात्मकतेचे महत्व शिकवतो. या सणानिमित्य आपण वाईट विचारांना सोडून सकारात्मकतेकडे वाटचाल करू. याचे महत्व शिक्षक-शिक्षिकांनी विद्यार्थ्यांना पटवून दिले.

आयोजित कार्यक्रमाला नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्थेचे सचिव अशोकजी भैया सर, शाळेच्या संचालिका आशिता भैया मॅडम, प्राचार्य कादिर कुरेशी सर, उपप्राचार्य रश्मी राठी मॅडम, पर्यवेक्षिका रश्मी झोडे मॅडम उपस्थित होत्या. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना दिपावलीच्या भरभरून शुभेच्छा दिल्या.

**वाचाल तर वाचाल..**



Miracle constructions & Developers
श्रीराम नगरी - डेव्हलपर्स
NATP प्लॉट्स उपलब्ध
सिंदेवाही
नवरगांव
तळोधी
चंद्रपुर (चौराळा)
संपर्क : अनिल दोनाडकर
मो. 8806776699, 9834946501
डुप्लेक्स बांधकाम करून मिळेल.

सोरते स्टेनलेस स्टील वर्क्स
प्रो.प्रा. सुरेश सोरते
मो. 8698323337


गीत (बुरले) पेट्रोल पंपसमोर
नागभीड रोड, ब्रम्हपुरी
रेलींग, ग्रिल व गेट
स्टिलचे नावे बनवून मिळेल.


# नगराध्यक्ष पदासाठी अनेक दिग्गजांच्या...

(पान क्र. १ वरून)

असल्याने नगराध्यक्ष पदासाठी सक्षम व योग्य उमेदवाराची निवड करण्याचा ताप राजकीय पक्षातील पक्षश्रेष्ठींना होणार आहे, हे मात्र नक्की. असे असले तरी, अधिकृत उमेदवारांची घोषणा व्हायला अजून बराच वेळ असला, तरी संभाव्य उमेदवारांची चाचपणी पक्षाकडून सुरू झाली आहे. काँग्रेसकडून कुणाला उमेदवारी मिळेल याबाबत तर्कवितर्क लावल्या जात आहे. उमेदवार निवडीचे सर्वाधिकार विधीमंडळ पक्षनेते तथा आमदार विजय वडेट्टीवार यांच्याकडे राहणार आहेत. तर भारतीय जनता पक्षाकडून उमेदवार निवडीचे सर्वाधिकार माजी आमदार अतुल देशकर यांच्याकडे राहणार असल्याचे कळते. साम, दाम, दंड, भेद वापरून ताकदीणीशी लढणारा उमेदवारच नगराध्यक्ष पदासाठी योग्य असल्याने त्यावर राजकीय पक्षाचे विचारमंथन सुरू आहे, तूर्तास एवढेच.

# नगरपालिका आचारसंहिता नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात?

ब्रम्हपुरी/का.प्र.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात राज्यातील नगरपालिकांच्या निवडणुका होणार असून या निवडणुकीची आचारसंहिता नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात लागणार असल्याचे कळते.

नगरपालिकेची निवडणुकीची प्रक्रिया डिसेंबरच्या विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनापूर्वी पूर्ण करण्यात येणार आहे. विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन सुरू असतानाच जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकीची आचारसंहिता लागू होईल. त्यामुळे राज्य सरकारला घोषणा करता येणार नाहीत. केवळ विधेयके मंजूर करता येतील, असा एक विचार निवडणूक आयोग करत आहे. अन्यथा एक आठवड्याचे अधिवेशन असेल. ते संपताच जिल्हा परिषदेची आचारसंहिता लागू शकेल. डिसेंबरअखेरला जिल्हा परिषदेची निवडणुकीची प्रक्रिया संपविण्याचा विचार आहे. त्यानंतर महापालिकेच्या निवडणुकीचे पडघम वाजतील.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जानेवारी अखेरपर्यंत घेण्याचे सर्वोच्च न्यायालयाचे आदेश आहेत. त्यामुळे नोव्हेंबर ते जानेवारी या तीन महिन्यांत पहिल्या टप्प्यात नगरपालिका, दुसऱ्या टप्प्यात जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या तर तिसऱ्या टप्प्यात मुंबईसह महापालिकांच्या निवडणुका घेण्यात येणार आहेत. यात नगरपालिकांच्या निवडणुकीची आचारसंहिता नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात लागण्याची शक्यता आहे.

# ने.हि. कन्या विद्यालयात वाचन प्रेरणा दिन

ब्रम्हपुरी/का.प्र.

दिनांक १५ ऑक्टोबर २०२५ रोज बुधवार ला आमच्या ने. ही. कन्या विद्यालय ब्रह्मपुरी येथे गाईड विभाग अंतर्गत वाचन प्रेरणा दिनाचा कार्यक्रम घेण्यात आला. गाईड कॅप्टन नगराळे मॅडम यांनी वाचनाचे महत्त्व विद्यार्थिनींना सांगितले, तसेच हात धुण्याचे प्रात्यक्षिक गाईड कॅप्टन कावळे मॅडम यांनी करून दाखविले. विद्यार्थिनींनी विविध पुस्तकांचे वाचन केले. शाळेच्या पर्यवेक्षिका खंडाते मॅडम यांनी डॉक्टर एपीजे अब्दुल कलाम विषयी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी ज्येष्ठ गाईड कॅप्टन सौ सेलोकर मॅडम यांनी मार्गदर्शन केले. शाळेचे उपमुख्याध्यापक श्री निखारे सर यांनी डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या जीवन कार्याविषयी बहुमोल मार्गदर्शन केले. तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका मॅडम यांनी विद्यार्थिनींना स्वच्छतेचे महत्व सांगितले. कार्यक्रमासाठी सर्व शिक्षक शिक्षिका व विद्यार्थिनी उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे संचालन कु.बनसोड मॅडम तर आभार प्रदर्शन भुरे मॅडम यांनी केले.

# निधन वार्ता



ब्रम्हपुरी/का.प्र.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ट स्वयंसेवक वामनराव भुसारी यांच्या पत्नी सरोज भुसारी यांचे दि. २८ ऑक्टोबर २०२४ ला सकाळी ११.३० वाजता निधन झाले. त्या ७४ वर्षाच्या होत्या. त्यांनी राष्ट्रसेविका समितीचे कार्य बरेच वर्षे केले.

त्यांच्या पश्चात पती, मुलगा, सुन, नाती, मुलगी, जावई नातु व बराच आप्त परिवार आहे. त्यांचा अत्यंविधी त्याच दिवशी सायंकाळी ४-३० वाजता ब्रहमपुरी येथे पार पडला.



Lubi PUMPS-MOTORS
बुधवार बंद
- दुकानाची वेळ - सकाळी १० ते सायं. ६ वा.
सी.आर.आय. मोटारपंपचे विदर्भातील प्रथम अधिकृत विक्रेता
गणेश ॲग्रीकल्चरल एजन्सी
रेल्वे स्टेशन रोड, खानोरकर भवन, भगतसिंग चौक, ब्रम्हपुरी
फोन नं. (07177) 272573 मोबाईल क्र. 9423115853, 7083214053
Kirloskar
CRI
ISO : 9001 : 2015 मानांकन प्राप्त दुकान
1994 पासून आपल्या सेवेत
किर्लोस्कर, एनसंस, लुबी, मोटार पंप, उषा, होन्डा, कॉमेट इंजीन, राज पी.व्ही.सी. पाईप, स्प्रिंकलर पाईप, आटा चक्की, हॅण्डपंप, केबल वायर व स्पेअर पार्टचे विक्रेता


Printed by Rajiv Pachpor published by Ashok Kisanlalji Bhaiya on behalf of Ashok Kisanlalji Bhaiya and printed at Aqua Process, Modi No.1, Sitabuldi, Nagpur and Published at Bramhapuri Samachar Office, Wadsa Road, Bramhapuri Editor Ashok Kisanlalji Bhaiya MAHMUL/2016/69789 Mob. 9422135404